# साधक ते श्रीसद्गुरूपर्यंतची जीवनगाथा - "ईश्वरेच्छा"

*अध्यात्मिक पातळीवर आत्मिक अनुभूती आणि निरंतर आनंद प्राप्तीचा ध्यास घेतलेले, आत्मरंगी सदैव रंगलेले, संपर्कात येत असलेल्या प्रत्येकांना अत्यंत प्रेमळपणाने जीवनातील आंतरिक परिवर्तनासाठी रोकडी प्रचिती देऊ करणारे संतसाहित्याचे अभ्यासक प. पू. श्रीसद्गुरू डॉ. गुरुनाथ विश्वनाथ मुंगळे यांच्या जीवनप्रवासात त्यांनी अनुभूती प्राप्त करताना घेतलेल्या प्रयासाचा प्रत्येक क्षण विलक्षण करणारा ग्रंथ अर्थात "ईश्वरेच्छा"*

---

- विद्यावाचस्पती विद्यानंद
**भ्रमणध्वनी :** ७७०९६१२६७५
**ईमेल :** vidyavachaspati.vidyanand@gmail.com

प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा, याचा ज्ञानकोश म्हणजे प. पू. श्रीसद्गुरू डॉ. गुरुनाथ विश्वनाथ मुंगळे महाराजांचे "ईश्वरेच्छा" हे चरित्र होय. नामाचे, ध्यानाचे, निस्सीम भक्तीचे, चिंतनाचे, भक्तीतील दृढतेचे, विकार आणि विकल्परहित विचारांचे, श्रीसद्गुरूंवरील विश्वासाचे, प्रेमळ नात्याचे, जीवनाच्या सत्य शोधनाचे, परमात्म्याच्या कृपेचे आणि ईश्वरी इच्छेचे महत्त्व अनुभवण्यासाठी श्रीमहाराज आयुष्यभर जीवनातील प्रवासात प्रयास करत आनंदी राहिले. नामाच्या, ध्यानाच्या आणि ईश्वरी इच्छेच्या महत्त्वाचे आणि महात्म्याचे त्यांनी जन्मभर स्वयं-अनुभूती प्राप्त झाल्यावरच ते पुरस्कृत केले. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण नामाचे, ध्यानाचे, श्रीसद्गुरुंच्या कृपेचे आणि ईश्वरी इच्छेचे महत्त्व आणि महात्म्य सांगण्यातच त्यांनी त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनातील प्रत्येक क्षण विलक्षण केले. ब्रह्मस्वरूपी विलीन झालेले प. पू. श्रीसद्गुरू डॉ. गुरुनाथ विश्वनाथ मुंगळे महाराज हे पूर्णत्वाप्रत पोहोचलेले, अध्यात्मिक उंची गाठलेले, अनेक संत, महाराज, अध्यात्मिक साक्षात्कारी विभूतींच्या सहवासाने, त्यांच्याबरोबर होत असलेल्या संवादाने प्रेरित होऊन स्वयं अध्यात्मिक अभ्यासातून यशस्वी ठरत राहिले.

प्रपंचात राहून परमार्थ आणण्यासाठी आणि नामस्मरणाची, धारणेची आणि ध्यानाची महती सांगण्यासाठी त्यांच्या ओघवत्या वाणीतून प्रसवलेल्या प्रवचनाच्या प्रत्येक शब्दाला श्रीसद्गुरुंची, ईश्वरी इच्छेची जोड असल्यामुळेच ते गोड होत असल्याची अनुभूती प्रत्येकास येत असे. संपूर्ण ब्रम्हांडात चैतन्य निर्माण करणारे शब्द लालित्य म्हणजे श्रीसद्गुरूंची प्रवचने. भक्ताला हा

अमृतानुभव घेण्यासाठी अगोदर लीन व्हावे लागते, तेव्हाच तो तल्लीन होऊ शकतो. नामाची गोडी आणि भगवंताची जोडी भक्ताला प्राप्त होते, तेव्हाच खरे तर तो केवळ जगण्यापलीकडचे जीवन अनुभवायला लागतो. नामाने बुद्धीही तरल होते आणि ही तरलता आत्मसाक्षात्कारालाही उपयोगी पडते. काळ, वेळ, वय अथवा परिस्थिती या कशाचेही बंधन नामाला नाही, असेही ते नमूद करतात.

श्रीसद्गुरूंच्या जन्मापासून ते अध्यात्मिक कार्यापर्यंत अर्थातच साधकापासून ते श्रीसदगुरूंपर्यंतच्या जीवन प्रवासाचा अध्यात्मिक पातळीवर त्यांचा उंचावत गेलेला आलेख आपणास समजून घेण्यासाठी मार्गदर्शक ठरतो. आपल्या अंतरंगात डोकावणे, हे कदाचित प्रयास देणारी प्रक्रिया वाटेल, परंतू तो जीवनाचा प्रवास समजून करत राहण्याची आवश्यकता आहे. आपल्या अंतरात्म्याची ओळख त्या माध्यमातून होणे शक्य होऊ शकते. त्याला निश्चितच योगाभ्यासाची जोड द्यावी लागेल. जेणेकरून आपला अंतरात्म्याचा शोधा अधिक सुकर होऊ शकतो आणि आत्मनिर्भर होण्यासाठी तो अत्यंत जरुरीचा देखील असतो. ह्या विषयाकडे आपण योग आणि ध्यान ह्या अभ्यासातून अध्यात्माचा विचार करण्याची आवश्यकता असते, "ईश्वरेच्छा" ह्या ग्रंथाच्या पठणामुळे आपल्याला त्यादृष्टीकोनातून मनपरिवर्तन आणि मतपरिवर्तन होण्यास मदत करते.

अध्यात्मिकतेच्या मार्गावर प्रथम केवळ ग्रहस्थ असलेल्या साधकास मार्गस्थ होण्यासाठी सकारात्मक वैचारिक मंथनाच्या माध्यमातून "ईश्वरेच्छा" ह्या ग्रंथाच्या अध्ययनाव्दारे यशप्राप्तीच्या योग्य मार्गाचे दर्शन घडू शकते. प्रत्येक साधकाने साधना ही नेहमीच त्यांचे कर्तव्य समजून नित्यनेमाने, अंतर्मुख होऊन, आत्मभान जागरूक ठेवून, आत्मिक आनंदासाठी केली पाहिजे असे त्यांनी ह्या ग्रंथात नमूद केले आहे. त्यासाठी सर्वप्रथम आत्मनिष्ठ होणे जरुरीचे असते. आपल्या आत्मनिष्ठतेमुळे आपल्यात नवचैतन्य, नवी उमेद, नवा उत्साह आणि नवा जोश निर्माण होत असतो. आत्मविश्वास वाढीस लागण्याची सुरुवात ह्याच प्रकारे होत राहते. आत्मविश्वास आणि श्रीसद्गुरूंवरील विश्वासच केवळ आपला श्वास सुरु ठेवून आपणास आत्मनाभूती आणि आनंदानुभूती देत राहू शकतात. ही निरंतर प्रक्रिया असल्याचे विसरून चालणार नाही, हे ही "ईश्वरेच्छा" ह्या ग्रंथात त्यांनी निक्षून सांगितले आहे.

अध्यात्मिक प्रबोधनातून भक्तांना नामामृत आणि ज्ञानामृत पाजण्याचे काम श्रीमहाराजांसाठी नित्याचेच होते. श्रीमहाराजांनी स्वतः जन्मभर डोळ्यांनी नाम पाहिले, कानांनी नाम ऐकले, वाणीने नाम घेतले, मनाने नाम कल्पिले, बुद्धीने नाम चिंतिले आणि अंतरात्म्याला नामाच्या अनुभूतींची प्रचीती प्राप्त करून दिली. काया वाचा मनाने जगात एका नामाशिवाय त्यांनी दुसरे काहीच सत्य मानले नाही. त्याच्या फलद्पतेचे श्रेय स्वतःकडे न घेता, त्यांच्या जीवनात जे काही घडले, घडत आहे आणि घडणार आहे, ते सर्वकाही ईश्वरी इच्छाच आहे असेच ग्रंथातील प्रत्येक विषयात आणि आशयात स्पष्ट केले आहे.

देहबुद्धी मूळापासून जाळून टाकल्यामुळे त्यांच्या आचारात, विचारात, उच्चारात तसेच विचारांत, वर्तनात आणि व्यवहारांत चुकून देखिल मी पणा अथवा माझेपणा दिसत नाही. हेच त्यांच्या पूर्णत्वाचे गमक आणि संत असल्याचे मूळ लक्षण होय. अर्थात स्वत:बद्दल काहीच करायचे न उरल्यामुळे केवळ जीवनाचे, मनुष्य जन्म जगण्याच्या संधीचे सोने व्हावे, कल्याण व्हावे एवढीच त्यांची भावना होती. प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा याचा ज्ञानकोश म्हणजे प्रेमाचा पाझर फुटणाऱ्या श्रीमहाराजांचे चरित्र होय. प्रापंचिकाच्या, साधकांच्या प्रत्येक अध्यात्मिक शंकेचे उत्तर त्यांच्या चरित्रात सापडते. अर्थात, सर्व उत्तरे म्हणजेच, श्रीमहाराजांनी स्वानुभूतिव्दारे शब्दांकित केलेल्या आणि स्वअध्ययनाव्दारे त्यांना प्राप्त झालेल्या प्रचीतीच आहेत. बालपणापासून वैदिक अनुष्ठानें, नामजप, भजनसप्ताह, संतांशी संवाद त्यांचा सहवास, श्रीगुरुचरित्राची पारायणे, तीर्थयात्रा स्वतः करून प्रपंचात राहून त्यांनी परमार्थाचा आनंद मिळवला.

भ्रमाच्या पलीकडे काय आहे, ते जाणावयाचे असेल तर देहाला आणि देहातील सर्व वृत्तींना मनाच्या सहाणेवर उगाळत ठेवून विविध वृत्तींच्या मेळातून निर्माण होणारे वृत्तीगंधरहित गंध मला समर्पित होऊन बाजूला होवो. समर्पणाची प्रक्रिया बोली भाषेत सोपी असली तरी त्यासाठी करावयास लागणारा अट्टाहास फारच मोठा असतो आणि अट्टाहासातून होणारी फलप्राप्ती त्या अव्यक्ताच्याच हातात असते. अशा स्वरूपातील स्वानुभूतिव्दारे त्यांना प्राप्त झालेल्या अनेक प्रचीती त्यांनी शब्दांकित केल्या आहेत. हा लेखनप्रपंच करण्याचे कारण कोणाला काही शिकवावे, काही सांगावे असे नसून, "ईश्वरेच्छा" हे बालपणापासून बरोबर असलेले पाथेय कसे कार्यरत होत असते याचेच प्रकटीकरण करावेसे वाटते, असे ग्रंथाच्या प्रारंभीच श्रीमहाराजांनी स्पष्ट केले आहे. तसेच ते पुढे असेही म्हणतात कि, मी काही साहित्यिक नाही, पण सुंदर साहित्याचा मी उपासक आहे. उपासकाला वारंवार आपली निष्ठा स्वतःच तपासावी लागते. ती निष्ठा निर्माण करण्याचे काम श्रीसद्गुरू महाराज करत असतात आणि साधकाच्या उपासनेचे सुनियोजन श्रीसद्गुरूकृपेनेच होत असते.

त्यांच्या वडिलांकडून घरात श्रीदत्त सेवा तर आईकडून श्रीज्ञानेश्वर माउलींची सेवा चालू असे. त्यांच्या दोन्हीही घराण्यात ईश्वरसेवेची आवड होती. अगदी बालवयात देवाच्या अस्तित्वाची एक वेगळी जाणीव त्यांना स्वप्नात झाली, बालवयातील तो निरागस आनंद पुढे साधनकाळात त्यांनी त्यामुळेच अनुभवला. त्यांनी बालपणात देखील देवाच्या दिव्याच्या मिणमिणत्या प्रकाशात आणि चिमणीच्या उजेडात काही स्तोत्रे म्हणण्याचा परिपाठही ठेवला होता. पण देवाने आपल्याला काही द्यावे ह्या अपेक्षा त्यांच्या अंतर्मनाला कधीही शिवल्या नाहीत, असेही ते सुरुवातीलाच स्पष्ट करतात. कोल्हापूर आणि शेणगाव येथे असताना त्यांचे बालपण, त्यादरम्यान झालेले शिक्षण संस्कार त्यांच्या पुढील अध्यात्मिक प्रवासात महत्वपूर्ण भूमिका बजावत राहिले.

परमार्थ हा चर्चेचा विषय नाही, तर तो प्रत्यक्ष अनुभूतीचाच विषय आहे, याची खुणगाठ जर मनाशी पक्की बांधली तर त्यातून साधकास प्राप्त होणारी शक्ती नुसती त्याला जागवत नाही, तर त्याचे जीवन सफल करण्यास मदत करत राहते, हे ह्या ग्रंथाच्या अध्ययनाने वाचकांना, साधकांना नीटपणे समजू शकते. अध्यात्म्याचा अंत:करणातून पुरस्कार होऊ लागल्यावर प्रेमभावाची होणारी जागृती आपल्या अवतीभवती वावरणाऱ्या माणसातही बदल घडवून आणते; इतकेच नव्हे, तर विशेष प्रेमभाव प्राणिमात्रांच्या सहवासात जर प्रकट होत राहिला, तर त्यांच्यातही बदल झाल्याचे जाणवते.

ह्या ग्रंथात त्यांनी त्यांच्या अध्यात्मिक प्रयासात कोणकोणत्या विभूतींचे, संतांचे, महराजांचे, तत्वज्ञानी व्यक्तींचे मार्दर्शन लाभले तसेच ह्या प्रवासात साधक परिवारातील कोणकोणत्या व्यक्तींची साथ-सोबत मिळाली त्यांचाही आवर्जून नामोल्लेख केला आहे. त्यासाठी त्या सर्वांचे त्यांनी आभार देखील मानले आहेत. जीवनातील विविध प्रकारचे चांगले-वाईट अनुभव, सुख-दु:ख याबाबत देखील त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यांच्या बौद्धिक गृहितकांना जे पटले ते त्यांनी स्वीकारले आणि न पटलेल्या बाबींकडे, मतांकडे, विचारांकडे दुर्लक्ष केले. विचारांमध्ये विकल्प निर्माण करणाऱ्या विकारात अडकून न राहता त्यांच्या श्रीसद्‌गुरुप्राप्तीच्या संकल्प पूर्तीसाठी ते सदैव प्रयोगशील, प्रयत्नशील, चिंतनशील राहिले.

एक सामान्य साधक ते असामान्यत्व प्राप्त झालेल्या श्रीसद्‌गुरूपर्यंतची जीवनगाथा लिहिताना "ईश्वरेच्छा" च्या माध्यमातून त्यांनी स्वतःला सतत एक सामान्य साधकच समजून घेतले, कधीही श्रीसद्‌गुरुंचे स्थान प्राप्त झाल्याचे भासवले अथवा स्वतःला मिरवले नाही. ते प्रसिद्धीपासून सदैव दूरच रहात आले. तसेच त्यांच्या संपर्कात येणाऱ्या साधकांशी मैत्रीपूर्ण नाते जपले, त्यानाही कधी त्यांचे शिष्य समजले नाही. ह्याही सर्व बाबींना ते, ही केवळ "ईश्वरेच्छा" असल्याचेच म्हणत आले. अध्यात्मिक अनुभूती घेण्यासाठी "ईश्वरेच्छा" हा ग्रंथ प्रत्येकाने एकदा तरी अध्ययनाच्या दृष्टीने वाचावा आणि शक्य झाल्यास आपल्या ग्रंथसंपदेत समाविष्ट करावा.